01 NOV 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा गौरव : जागतिक संशोधकांचा समावेश

# 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स'मध्ये कुलगुरूंसह ४८ संशोधक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : जागतिक पातळीवरील 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स - २०२१'तर्फे जाहीर झालेल्या जागतिक संशोधकांच्या अद्ययावत क्रमवारीत शिवाजी विद्यापीठातील कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह एकूण ४८ वैज्ञानिक, संशोधकांचा समावेश झाला आहे.


डॉ. डी. टी. शिर्के


डॉ. पी. एस. पाटील

शिवाजी विद्यापीठात विविध विषयांत अखंडित संशोधन सुरू असून, त्याचे हे फलित आहे.
- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू

अमेरिकेच्या मिशीगन विद्यापीठातील प्रा. मूरत आल्पर, सिहान डॉजर यांनी 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स' विश्लेषित केला आहे. त्यासाठी गुगल स्कॉलरवरील संशोधकांचा गेल्या पाच वर्षांतील एच-इंडेक्स, आय-टेन इंडेक्स हे निर्देशांक, सायटेशन स्कोअरचे पृथक्करण केले. जगातल्या १३,५४२ शैक्षणिक संस्थांमधील ५,६५,५५३ संशोधकांचा डाटा त्यांनी संकलित केला. त्यातून 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२१' जाहीर करण्यात आले आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाशी संबंधित डॉ. के. वाय. राजपुरे, सी. एच. भोसले, आण्णासाहेब मोहोळकर, एन. आय. तरवाळ, राजेंद्र सोनकवडे, टी. जे. शिंदे, मानसिंग टाकळे, ए. बी. गडकरी, विजया पुरी, सोनल चोंदे (पदार्थविज्ञान, मटेरियल सायन्स व धातूविज्ञान). डॉ. के. एम. गरडकर, एस. एस. कोळेकर, ए. व्ही. घुले, एस. डी. डेळेकर, जी. बी. कोळेकर, डी. एम. पोरे, राजश्री साळुंखे, एम. बी. देशमुख, डी. एच. दगडे, गजानन राशीनकर, अनंत दोड्डमणी (रसायनशास्त्र), डॉ. एन. बी. गायकवाड, एन. एस. चव्हाण, डी. के. गायकवाड (वनस्पतीशास्त्र), डॉ. एस. पी. गोविंदवार, ज्योती जाधव, नीरज राणे (जैवतंत्रज्ञान व बायोरिमेडिएशन), डॉ. एम. व्ही. शांताकुमार, टी. व्ही. साठे (प्राणीशास्त्र). डॉ. के. डी. सोनवणे, पंकज पवार, पी. बी. दंडगे (जैवरसायनशास्त्र). डॉ. पी. एन. वासंबेकर, टी. डी. डोंगळे, आर. आर. मुधोळकर (इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स), डॉ. एस. बी. सादळे, एन. आर. प्रसाद, किरण कुमार शर्मा (नॅनोसायन्स व तंत्रज्ञान), डॉ. पी. डी. राऊत, विजय कोरे (पर्यावरणशास्त्र), डॉ. ए. के. साहू, राहुल रणवीर (अन्नविज्ञान व अभियांत्रिकी), डॉ. एस. आर. सावंत (संगणकशास्त्र), के. डी. कुचे (गणितशास्त्र), डॉ. जॉन डिसुझा, संतोष पायघन (फार्मसी) यांचा समावेश आहे.

लोकमत

# इंदिरा गांधी, सरदार पटेल यांना अभिवादन

कोल्हापूर : भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी यानिमित्त त्यांना शिवाजी विद्यापीठात रविवारी आदरांजली वाहण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत सरदार पटेल, इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. अभिवादनानंतर राष्ट्रीय एकता दिनानिमित्त उपस्थितांनी एकता व सद्‌भावना यांची शपथ घेतली. या वेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. पी. जे. पाटील, डॉ. प्रमोद कसबे आदी उपस्थित होते.

0 1 NOV 2021 लोकमत
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहरातील हवेची होणार तपासणी

## महापालिकेचा पहिलाच प्रयत्न : हवा गुणवत्ता निर्देशांक पाहणार

भारत चव्हाण
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोल्हापूर शहरामधील हवेत असणाऱ्या धूलिकणाचे विश्लेषण करण्याबरोबरच भविष्यातील उपाययोजना करणे सायीचे व्हावे म्हणून महानगरपालिका पर्यावरण विभागामार्फत दिवाळीआधी आणि दिवाळीनंतर अशा दोन सत्रांत शहरात हवा निर्देशांक तपासणी करण्यात येणार आहे.

प्रत्येक वर्षी महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ व शिवाजी विद्यापीठ पर्यावरण विभाग हवा गुणवत्ता निर्देशांक तपासणी करते; पण यंदा कोल्हापूर महानगरपालिका पर्यावरण विभाग प्रथमच स्वतंत्रपणे हवा गुणवत्ता निर्देशांक तपासत आहे. याचे काम एका खासगी संस्थेला देण्यात आले आहे.

हवा गुणवत्ता निर्देशांक तपासणीकरिता शहरात सुभाष स्टोअर्स व कावळा नाका परिसरात दोन हाय व्हॅल्यूम सॅम्पलर मशीन बसविण्यात आल्या आहेत. मशीन ज्या ठिकाणी असेल त्याच्या सभोवती साधारण दोन ते पाच किलोमीटरपर्यंतच्या परिसरातील हवा गुणवत्ता निर्देशांक तपासला जातो. दिवाळीआधी काही दिवस आणि दिवाळी झाल्यानंतर दोन-तीन दिवसांनी ही मशीन काम करतील आणि हवेतील गुणवत्ता निर्देशांक तपासला जाईल. तपासणी केल्यानंतर संबंधित कंपनी शास्त्रीय अहवाल महानगरपालिकेला देणार आहे. ज्याच्या मदतीने भविष्यातील उपाययोजना करण्याचे नियोजन करता येणार आहे.

### धूलिकणाचे प्रमाण कळणार



- या तपासणीमुळे शहरातील हवेत असणारे धूलिकणाचे प्रमाण किती आहे हे कळणार आहे, तसेच पुढील काळात धूलिकणाचे प्रमाण कमी करण्याकरिता उपाययोजना राबविणे शक्य होणार आहे. यापूर्वी महानगरपालिका क्षेत्रातील हवा, पाणी प्रदूषणाबाबत फारसे गांभीर्याने पाहिले जात नव्हते.
- परंतु आता शहरातील प्रदूषणाची जबाबदारी कायद्याने महानगरपालिकांवर सोपविण्यात आली आहे, तसेच वार्षिक उत्पन्नातील पंचवीस टक्के रक्कम ही प्रदूषण कमी करण्यावर खर्च करण्याचे बंधन घालण्यात आले आहे.

> दिवाळीपूर्वीचे आणि दिवाळीनंतरचे हवेतील प्रदूषण तपासल्यानंतर महापालिकेला काही उपाययोजना करणे सोयीचे होईल. प्रदूषण रोखण्यासाठी पालिका प्रशासन प्रयत्नशील आहे. नागरिकांनीही फटाकेमुक्त दिवाळी साजरी करून प्रशासनाला सहकार्य करावे.
>
> \- **डॉ. कादंबरी बलकवडे**, प्रशासक, महानगरपालिका

01 NOV 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक संशोधकांच्या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठातील ४८ संशोधक

## 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२१'ची क्रमवारी जाहीर

### कुलगुरू, प्र-कुलगुरूंचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जागतिक पातळीवरील 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२१'तर्फे जाहीर करण्यात आलेल्या जागतिक संशोधकांच्या अद्ययावत क्रमवारीत शिवाजी विद्यापीठातील कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह ४८ वैज्ञानिक, संशोधकांचा समावेश झाला आहे. व्यापक स्तरावर घेण्यात आलेल्या क्रमवारीत विद्यापीठाच्या संशोधकांचा समावेश ही कोल्हापूर शिरपेचात तुरा खोवणारी गोष्ट आहे.

अमेरिकेच्या मिशिगन विद्यापीठातील प्रा. मूरत आल्पर व प्रा. सिहान डॉजर यांनी संयुक्तपणे 'आल्पर-डॉजर सायंटिफीक इंडेक्स' तथा 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स' विश्लेषित केला आहे. त्यासाठी त्यांनी गुगल स्कॉलरवरील संशोधकांचा गेल्या पाच वर्षांतील एच-इंडेक्स, आय-टेन इंडेक्स हे निर्देशांक व सायटेशन स्कोअर या बाबींचे पृथक्करण केले. जगातील १३ हजार ५४२ शैक्षणिक संस्थांमधील ५ लाख ६५ हजार ५५३ संशोधकांचा डेटा त्यांनी संकलित केला.



कृषी व वने, कला व स्थापत्य, वाणिज्य व व्यवस्थापन, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, इतिहास, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, कायदे अभ्यास, वैद्यकीय व आरोग्य विज्ञान, नैसर्गिक शास्त्रे व सामाजिक शास्त्रे यांसह अन्य २५६ उपशाखांमधील संशोधकांचा समावेश या मानांकनात केला आहे. त्यातून 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२१' जाहीर करण्यात आले आहे. संशोधकांत स्थान प्राप्त करणारे कुलगुरू डॉ. शिर्के संख्याशास्त्र विषयातील एकमेव संशोधक ठरले आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांना मटेरियल सायन्स, सौरघट, इलेक्ट्रोमॅग्नेटिझम, गॅस सेन्सर आणि नॅनोविज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधनासाठी क्रमवारीत आघाडीचे स्थान प्राप्त झाले आहे.



डॉ. डी.टी. शिर्के



डॉ. पी.एस. पाटील

**क्रमवारीतील संशोधक...**

**संख्याशास्त्र** : डॉ. डी. टी. शिर्के. **पर्थविज्ञान, मटेरियल सायन्स व धातूविज्ञान :** डॉ. पी.एस. पाटील, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. अण्णासाहेब मोहोळकर, डॉ. एन. आय. तरवाळ, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. टी. जे. शिंदे (के.आर.पी. महाविद्यालय, इस्लामपूर), डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. ए. बी. गडकरी (गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर), डॉ. विजया पुरी (धातूविज्ञान), डॉ. सोनल चोंदे (धातूविज्ञान व मटेरियल सायन्स).

**रसायनशास्त्र** : डॉ. के.एम. गरडकर, डॉ. एस.एस. कोळेकर, डॉ. ए.व्ही. घुले, डॉ. एस.डी. डेळेकर, डॉ. जी.बी. कोळेकर, डॉ. डी.एम. पोरे, डॉ. राजश्री साळुंखे, डॉ. एम.बी. देशमुख, डॉ. डी.एच. दगडे, डॉ. गजानन राशीनकर, डॉ. अनंत दोड्डमणी.

**वनस्पतीशास्त्र** : डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. एन.एस. चव्हाण, डॉ. डी.के. गायकवाड.

**जैवतंत्रज्ञान व बायोरिमेडिएशन** : डॉ. एस.पी. गोविंदवार, डॉ. ज्योती जाधव, डॉ. नीरज राणे (जैवतंत्रज्ञान अधिविभागातील संशोधक विद्यार्थी).

**प्राणिशास्त्र** : डॉ. एम.व्ही. शांताकुमार, डॉ. टी.व्ही. साठे. **जैवरसायनशास्त्र** : डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. पंकज पवार, डॉ. (श्रीमती) पी. बी. दंडगे.

**इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक्स** : डॉ. पी.एन. वासंबेकर (इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक्स), डॉ. टी.डी. डोंगळे (नॅनो-इलेक्ट्रॉनिक्स), डॉ. आर.आर. मुधोळकर (इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी).

**नॅनोसायन्स व तंत्रज्ञान** : डॉ. एस. बी. सादळे, डॉ. एन.आर. प्रसाद, डॉ. किरण कुमार शर्मा. पर्यावरणशास्त्र- डॉ. पी.डी. राऊत (पर्यावरणशास्त्र), डॉ. विजय कोरे (पर्यावरण अभियांत्रिकी). **अन्नविज्ञान व अभियांत्रिकी** : डॉ. ए.के. साहू, डॉ. राहुल रणवीर. **संगणकशास्त्र** : डॉ. एस.आर. सावंत. **गणितशास्त्र** : डॉ. के.डी. कुचे. **फार्मसी** : डॉ. जॉन डिसुझा (तात्यासाहेब कोरे फार्मसी महाविद्यालय), संतोष पायघन.

> शिवाजी विद्यापीठात विविध विषयांवर संशोधन सुरू असून, त्याचे हे फलित आहे. यापूर्वी स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केलेल्या जगातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या यादीत शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांचा समावेश होता. त्या संशोधन कार्याला 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स'मुळे पुष्टी लाभली आहे.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

पुढारी

# मुक्त विद्यापीठाच्या पीएच. डी. धारकांना शिवाजी विद्यापीठाची मान्यता

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची पीएच.डी. पूर्ण केलेल्या शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेने प्राध्यापक पदासाठी मान्यता दिली आहे, अशी माहिती कोल्हापूर विभागीय केंद्राचे वरिष्ठ वैज्ञानिक सल्लागार प्रा. डॉ. आर. व्ही. कुलकर्णी यांनी दिली. विद्यापीठाच्या नुकत्याच झालेल्या विद्या परिषद बैठकीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखालील समितीने निर्णय घेतला आहे. मुक्त विद्यापीठाने १९९८ ते २०१८ या कालावधीत सुमारे १९१ विद्यार्थ्यांना पीएच.डी. प्रदान केली आहे. पुणे व मुंबई विद्यापीठाने अशा प्रकारची मान्यता पूर्वीच दिली आहे.

पुण्यनगरी

# तंत्रज्ञान अधिविभागातील अकरा विद्यार्थ्यांची 'टीसीएस'मध्ये निवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील ११ विद्यार्थ्यांची 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)' या नामांकित मल्टिनॅशनल कंपनीत निवड झाली. बी.टेक. अंतिम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी टीसीएस कंपनीमार्फत निवड चाचणी घेण्यात आली. त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन या शाखेतून सुशांत जाधव, ऋषीकेश घडक, वीरेन शहा, रोहित पाटील आणि जान्हवी नांदवडेकर या पाच विद्यार्थ्यांची, कॉम्प्युटर सायन्स व टेक्नॉलॉजी या शाखेतून कोमल पुरोहित, तेजल आंबोळकर, श्रेयस पाटील व ओंकार चौगुले या चार, तर केमिकल टेक्नॉलॉजी शाखेतील अंकेश चौगुले आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेतून आशुतोष शिरोळे या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांची 'असिस्टंट सिस्टीम इंजिनिअर' या पदावर निवड झाली. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक व विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, तंत्रज्ञान अधिविभागाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. एस. बी. सादळे, तसेच डॉ. पी. डी. पाटील, डॉ. ए. बी. कोळेकर, डॉ. रश्मी देशमुख आणि डॉ. श्यामकुमार चव्हाण यांचे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. अमर डूम, चेतन आवटी, प्रशांत पाटील व एस. बी. काळे यांनी प्लेसमेंटसाठी प्रयत्न केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

पुण्यनगरी

# विसाव्या शतकात केशवराव जेधे तेजस्वी पर्व : डॉ. अरुण भोसले

कोल्हापूर : विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय जीवनातील केशवराव जेधे हे तेजस्वी पर्व होते. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची योग्य दखल घेतल्याखेरीज आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास अपूर्ण आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ व विचारवंत डॉ. अरुण भोसले यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे संयोजित 'डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानमाला-२०२१' अंतर्गत 'देशभक्त केशवराव जेधे : कार्यकर्तृत्व' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानादरम्यान ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ होते. डॉ. अरुण भोसले म्हणाले, महाराष्ट्राच्या जनमानसावर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा तेजस्वी प्रभाव केशवराव जेधे यांनी प्रस्थापित केलेला होता. ते केवळ सामाजिक, राजकीय नेते होते असे नव्हे, तर लेखक, पत्रकार, शिक्षक, गीतकार, कवी, गायक असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व त्यांना लाभलेले होते.

यावेळी किशोर बेडकिहाळ यांनी मनोगत व्यक्त केले. गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. डॉ. शिवाजी पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. एस. एस. महाजन, अशोक बाबर, डॉ. बी. एम. हिर्डेकर, दशरथ पारेकर, नंदा पारेकर, डॉ. अरुण शिंदे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 NOV 2021

सकाळ

# जागतिक संशोधकांच्या क्रमवारीत शिर्के, पाटील

सकाळ वृत्तसेवा



डॉ.डी.टी.शिर्के डॉ.पी.एस.पाटील

कोल्हापूर, ता. ३१ : जागतिक पातळीवरील 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२१'तर्फे जाहीर केलेल्या जागतिक संशोधकांच्या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांनी स्थान पटकावले आहे. याशिवाय विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या ४८ संशोधकांचा या इंडेक्समध्ये समावेश आहे. अमेरिकेच्या मिशीगन विद्यापीठातील प्रा. मूरत आल्पर आणि प्रा. सिहान डॉजर या दोघांनी संयुक्तपणे 'आल्पर-डॉजर सायंटिफीक इंडेक्स' तथा 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स' विश्लेषित केला आहे. त्यांनी गुगल स्कॉलरवरील संशोधकांचा पाच वर्षांतील एच-इंडेक्स, आय-टेन इंडेक्स हे निर्देशांक तसेच सायटेशन स्कोअर (उद्धरणे) आदी बाबींचे पृथक्करण केले. जगातल्या १३ हजार ५४२ शैक्षणिक संस्थांमधील ५ लाख ६५ हजार ५५३ संशोधकांचा डाटा त्यांनी संकलित केला. संशोधकांत स्थान प्राप्त करणारे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के संख्याशास्त्र विषयातील एकमेव संशोधक ठरले आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांना मटेरियल सायन्स, सौरघट, इलेक्ट्रोमॅग्नेटिझम, गॅस सेन्सर आणि नॅनोविज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधनासाठी क्रमवारीत आघाडीचे स्थान प्राप्त झाले आहे. या क्रमवारीत रसायनशास्त्राचे ११, पदार्थविज्ञान व मटेरियल सायन्सचे ९, वनस्पतीशास्त्र, जैवतंत्रज्ञान, जैवरसायनशास्त्र, नॅनो विज्ञान व तंत्रज्ञान, इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक्स या विषयांचे प्रत्येकी ३, प्राणीशास्त्र, पर्यावरणशास्त्र, धातूविज्ञान, अन्नविज्ञान व फार्मसी या विषयांचे प्रत्येकी २ आणि गणित व संगणकशास्त्राचे प्रत्येकी १ असे एकूण ४८ आजी-माजी संशोधक समाविष्ट आहेत.

सकाळ

# विद्यापीठात पटेल, गांधी यांना अभिवादन

टेंबलाईवाडी, ता. ३१ : लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिवाजी विद्यापीठात आज आदरांजली वाहण्यात आली.

कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत सरदार पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. नंतर राष्ट्रीय एकता दिनानिमित्त उपस्थितांनी एकता व सद्भावनेची शपथ घेतली.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. पी. जे. पाटील, डॉ. प्रमोद कसबे यांच्यासह नॅनो सायन्स व तंत्रज्ञान स्कूलचे शिक्षक, विद्यार्थी, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.